**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत ग्रामपंचायतीमार्फत तयार करण्यात आलेल्या रोपवाटीकेतील रोपांची विक्री करण्यासंदर्भात.**

**महाराष्ट्र शासन**

शासन निर्णय क्र. मग्रारो २०१२/प्र.क्र २७/रोहयो-०१

नियोजन विभाग ( रोहयो प्रभाग )

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक : २७ जून, २०१२.

**वाचा :-** १) महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र.एफडीएम-२०११/प्रक्र.१०४/फ-२, दिनांक २५ ऑक्टोबर, २०११.

२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. मग्रारो - २०११/प्रक्र २८/रोहयो-१, दिनांक १० मे, २०११.

३) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. मग्रारो - २०११/प्रक्र १२९/रोहयो-१०-अ, दिनांक ५ डिसेंबर, २०११.

४) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. मग्रारो - २०१२/प्रक्र १/रोहयो - १०-अ, दिनांक १ मार्च, २०१२.

**प्रस्तावना :-**

महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र.एफडीएम-२०११/प्रक्र.१०४/फ-२, दिनांक २५.१०.२०११ अन्वये राज्यामध्ये शतकोटी वृक्ष लागवडीचा महत्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत ग्रामपंचायतीमार्फत रोपवाटीका तयार करणे व वृक्ष लागवड करण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तदनुसार ग्रामपंचायतींनी मोठ्या प्रमाणावर रोप वाटीकांची निर्मिती केलेली आहे.

२. शतकोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत काही वृक्ष लागवड ही महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र मधील शासन निर्णयाप्रमाणे तर काही वृक्ष लागवड ही पर्यावरण संतुलन कार्यक्रमांतर्गत होणार आहे. तसेच बरीचशी वृक्ष लागवड ही लोकसहभागातून होणार आहे. या सर्व प्रकारच्या वृक्ष लागवडीसाठी या वर्षी व गत वर्षीच्या रोपवाटीके मधील रोपे मोठ्या प्रमाणात वापरली जाणार आहेत.

३. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत ग्रामपंचायतीमार्फत तयार करण्यात आलेल्या रोपवाटीकेतील रोपांची लागवड ग्रामपंचायत क्षेत्रात करण्यात येणार आहे. अशाप्रकारे लागवड केल्यानंतर शिल्लक राहिलेल्या रोपांचे वाटप करण्याबाबत शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

**शासन निर्णय :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत ग्रामपंचायतीमार्फत तयार करण्यात आलेल्या रोपवाटीकेतील रोपांची ग्रामपंचायत क्षेत्रात योग्य रोपांची योजनेखाली लागवड केल्यानंतर शिल्लक राहिलेल्या रोपांचे वाटप व विक्री करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासन मान्यता देत आहे:-

१) सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक संस्था आपल्या आवारात त्यांच्या मालकीच्या जमिनीवर वृक्ष लागवड करणार असतील तर अशा संस्थांकडून त्याबाबतचे प्रमाणपत्र घेऊन त्यांना ग्रामपंचायतीमार्फत रोपांचे मोफत वाटप करण्यात यावे. तथापि सदर रोपांची लागवड करून त्यांचे संगोपन व संरक्षण करण्याची जबाबदारी त्या संबंधीत संस्थेची राहील, ही बाब संबंधित संस्थेच्या

निदर्शनास आणण्यात यावी. मात्र संगोपन व संरक्षणासाठी स्वतंत्र मोबदला शासनामार्फत देण्यात येणार नाही, याची स्पष्ट कल्पना संबंधित संस्थेला देण्यात यावी.

२) खाजगी व्यक्ती, संस्था व कंपन्या यांनी रोपांची मागणी केल्यास त्यांना रोपांची विक्री करण्याचे अधिकार खालील समितीस राहतील.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | गट विकास अधिकारी, | - | अध्यक्ष |
| ब) | कृषि अधिकारी (पंचायत समिती), | - | सदस्य |
| क) | सहायक लेखा अधिकारी ( पंचायत समिती ) | - | सदस्य सचिव |

३) उपरोक्त समितीने खाजगी व्यक्ती, संस्था व कंपन्या यांना त्यांच्या मागणीनुसार रोपांची विक्री करतांना खालीलप्रमाणे कार्यवाही करावी:-

अ) मोफत रोपांचे वाटप करतांना शैक्षणिक संस्था, दवाखाने, धार्मिक व सामाजिक संस्थांची सत्यता पडताळणी करावी.

ब) रोपांची विक्री करतांना रोप निर्मितीसाठी झालेला कुशल खर्च वसुल होईल ही बाब विचारात घेऊन विक्रीचा दर निश्चित करावा.

क) उपरोक्त प्रमाणे रोप विक्रीतून जमा झालेली रक्कम नरेगासाठी उघडण्यात आलेल्या पंचायत समितीच्या बँक खात्यात जमा करण्यात यावी. तसेच नरेगासाठी परिरक्षीत करण्यात येत असलेल्या रोख वहीमध्ये (कॅश बुक) तपशिल या स्तंभात रोख विक्रीच्या व्यवहाराचा संक्षिप्त तपशिल नोंदवावा व जमा केलेली रक्कम संकिर्ण या स्तंभात नोंदवावी.

ड) उपरोक्तप्रमाणे रोप विक्रीतून जमा झालेली रक्कम कोणत्याही परिस्थितीत कोषागारात भरु नये.

४) सर्वच रोपांची विक्री अनिवार्य नाही. शिल्लक रोपांचा वापर पुढील वर्षी उंच रोपे म्हणून करता येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

दि. ७/१२/२१-

(व्ही. गिरीराज)
प्रधान सचिव (रोहयो)

प्रति,

मा.राज्यपाल यांचे खाजगी सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

VRIKSHA LAGWADC:\Documents and Settings\Administrator\Desktop

प्रधान सचिव, (कृषि) कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
सचिव (ग्राम विकास) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
सर्व विभागीय आयुक्त,
आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
आयुक्त (रोहयो), नागपूर,
प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
उप सचिव (रोहयो समिती), महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
सर्व जिल्हाधिकारी, (मुंबई व मुंबई उपनगर वगळून),
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व जिल्हे),(मुंबई व मुंबई उपनगर वगळून),
विभागीय कृषि सहसंचालक, ठाणे, पुणे, कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, लातूर,
सर्व अधिक्षक कृषि अधिकारी,
सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते, नागपूर/अमरावती/औरंगाबाद/नाशिक /पुणे/कोकण वृत्त ठाणे,
सर्व मुख्य वन संरक्षक / सर्व उप वनसंरक्षक,
सर्व विभागीय वन संरक्षक / सर्व विभागीय मृदसंधारण अधिकारी,
सर्व उप संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, (सर्व जिल्हे),(मुंबई व मुंबई उपनगर वगळून),
सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,(सर्व जिल्हे), (सर्व जिल्हे), (मुंबई व मुंबई उपनगर वगळून),
महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र -१ व २ मुंबई व नागपूर,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१ व २ मुंबई व नागपूर,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
कक्ष अधिकारी, संग्राम कक्ष, ग्राम विकास व जलसंधारण विभाग (महाऑनलाईन वेबसाईटवर वितरणासाठी )
सर्व कार्यासन अधिकारी, रोहयो प्रभाग व जलसंधारण विभाग, निवड नस्ती रोहयो -१०-अ